# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

(93)

परीक्षा प्राधान्य

**गोपनीय/ महत्वाचे**

परिपत्रक क्र. मुंविमं/ माध्य. गोप./२८७०
नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : १०/०२/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जि. मुंबई / बृहन्मुंबई / ठाणे / पालघर / रायगड

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल-२०२२ च्या परीक्षेकरीता परीक्षक/ नियामकांच्या अंतिम नियुक्तीबाबत..**

मार्च/एप्रिल-२०२२ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी आपल्या शाळेतील विषय शिक्षकांची परीक्षक/नियामक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्ती केलेल्या शिक्षकांच्या नावाची अंतिम नियुक्ती क्रमांक असलेली संगणकीय यादी या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे, त्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. या पत्रासोबत आपल्या शाळेतील परीक्षक/नियामक म्हणून अंतिम नियुक्ती दिलेल्या शिक्षकांची विषयनिहाय नावांची यादी पाठविण्यात येत आहे. सदर यादीवर संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घेण्यात यावी. यादीत नमुद केलेल्या शिक्षकांचा विषय, माध्यम, बदल झाला असल्यास त्यामध्ये दुरूस्ती करून स्वाक्षरीसह यादी दि.२८/०२/२०२२ रोजी मंडळ कार्यालयात हस्तपोहोच देण्यात यावी. काही शिक्षक सेवानिवृत्त झाले असल्यास, तशी नोंद करण्यात यावी. शिक्षकाची बदली झाली असल्यास बदली ठिकाणाच्या शाळेचे नाव पत्त्यासह सांकेतिक क्रमांक, इ. माहिती कळविण्यात यावी. शाळेत नव्याने नियुक्त किंवा बदली होऊन आलेल्या संबंधित विषयाच्या पात्रताधारक शिक्षकांची नावे (संपूर्ण माहितीसह) कळविण्यात येवून उत्तरपत्रिका तपासून घेण्याची व्यवस्था करावी. अपवादात्मक परिस्थितीत संबंधित विषयास शिक्षक उपलब्ध होत नसल्यास मंडळाकडे दूरध्वनीव्दारे संपर्क साधून उत्तरपत्रिकेच्या **पार्सलबाबत काय कार्यवाही करावी ? याबाबत मंडळाकडून सूचना प्राप्त करून घ्याव्यात.** कृपया कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकांचे गठ्ठे परस्पर मंडळाकडे परत पाठवू नयेत. अशा **उत्तरपत्रिकांचे** गठ्ठे मंडळात परत आल्यास त्यांचा परिणाम निकालावर होवू शकतो या करीता उत्तरपत्रिकांचे गठ्ठे परस्पर मंडळात पाठवू नये याची दक्षता घ्यावी.

२. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली,१९८१ मधील नियम २२ (१) (२)(एम) आणि २२(१) (४)(१९) नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या परीक्षेच्या कामासाठी शिक्षकांना नियुक्ती केल्यास ते काम संबंधित शिक्षकाने स्वीकारणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ व २८ एप्रिल, २००३ च्या असाधारण प्राधिकृत प्रकाशनाद्वारे जाहीर केलेल्या आदेशान्वये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट केलेली असल्याने कोणत्याही शिक्षकाचा परीक्षक/नियामक म्हणून काम करण्यास''नकार'' स्वीकारला जाणार नाही, याची जाणीव संबंधितांना सर्व शिक्षकांना करून द्यावी.

**३. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ही बारकोड पध्दतीने होत असल्यामुळे ज्या शिक्षकांचे पाल्य/मुलगा/मुलगी अथवा जवळचे नातेवाईक इ.१० वी परीक्षेला प्रविष्ठ होणार असतील तर अशा शिक्षकास या कारणास्तव परीक्षक/नियामकाचे काम करण्यास "नकार" देता येणार नाही. तसेच अशा कारणासाठी सदरच्या कालावधीत कळविलेला नकार विचारात घेतला जाणार नाही, याचीही नोंद घ्यावी.**

४. उत्तरपत्रिका तपासण्याचे काम नेहमीप्रमाणे ''विकेंद्रित केंद्रीय मूल्यमापन'' पध्दतीने करण्यात येत असल्याने उत्तरपत्रिकांचे मोहोरबंद गठ्ठे मुख्याध्यापक या पदनामाने आपल्या शाळेच्या पत्त्यावर पाठविण्यात येतील. तपासलेल्या उत्तरपत्रिका परीक्षकाने नियामकांकडे स्वतंत्रपणे पाठविण्याची व्यवस्था " परिरक्षक " म्हणून मुख्याध्यापक यांनी करावयाची आहेत.

५. परीक्षक/नियामक म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांनी उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे काम नाकारल्यास संबंधितांचे कृत्य मंडळाच्या गोपनीय/महत्वाच्या/ कालमर्यादित कामात अडथळा आणणारे समजण्यात येईल व त्याबाबतची गंभीरपणे नोंद घेऊन, व्यवस्थापनामार्फत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येईल, ही बाब संबंधितांच्या निर्दशनास आणून लेखी स्वरुपात कळवावी.

६. परीक्षक / नियामकांची नियुक्ती ही अंतिम स्वरूपाची असल्याने त्यांना नियुक्ती क्रमांक देण्यात आलेले आहेत. त्याबाबत नोंद घेण्याबाबत संबंधित शिक्षकांना सूचना आपणामार्फत देण्यात याव्यात. तसेच विषयाच्या अंतिम नियुक्तीबाबत नोंद घेतल्याची स्वाक्षरी घेऊन सदर नियुक्ती यादी दि. २८/०२/२०२२ रोजी मंडळ कार्यालयात हस्तपोहोच सादर करण्यात यावी.

७. आपल्या शाळेतील ज्या शिक्षकांची नियुक्ती ज्या विषयास परीक्षक / नियामक म्हणून करण्यात आली आहे ते शिक्षक मंडळ नियमावली **नियम क्र.३१** नुसार शैक्षणिक पात्रताधारक आहेत किंवा नाहीत? याचीही पडताळणी/जबाबदारी शाळाप्रमुख म्हणून मुख्याध्यापकांची राहिल.

८. इ.१० वी च्या वर्गास अध्यापनाचे काम करीत असलेल्या सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांची (केंद्रसंचालक म्हणून कार्यरत मुख्याध्यापक) परीक्षक/नियामक म्हणून नावे कळविणे आपल्यावर बंधनकारक आहे. काही शिक्षकांची नावे कळविली जात नाहीत अशा तक्रारी शिक्षक संघटनांकडून मंडळाकडे येत असतात, तरी याबाबतची दखल घेता आपण स्वतः काळजीपूर्वक प्रस्ताव (यादी) तपासून एकही शिक्षक मंडळाच्या कामापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच काही शिक्षकांची नावे अद्याप मंडळास कळविण्याचे राहून गेले असल्यास ती कृपया त्वरित कळवावी.

९. मार्च -२०२२ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या उमेदवारांची विषय / माध्यमनिहाय विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नियामक उपलब्ध न झाल्यास आवश्यकतेनुसार सेवाज्येष्ठ परीक्षकांची "नियामक" म्हणून नेमणूक मंडळाकडून करण्यात येते. आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे यथावकाश आपणांस कळविण्यात येईल.

१०. परीक्षेस नोंद झालेली विद्यार्थी संख्या व उपलब्ध परीक्षक संख्या विचारात घेवून कमी अधिक उत्तरपत्रिकेच्या संख्येनुसार लॉट तयार केले जातात, तथापि प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांच्या संख्येइतक्या उत्तरपत्रिका परीक्षकांना पाठविल्या जाणार असल्याने परीक्षक म्हणून नेमणूका केल्या आहेत अशापैकी काहींना पेस्टेड स्लिपवर नमूद केलेल्या संख्येपेक्षा कमी संख्येने उत्तरपत्रिका मिळाल्यास परिरक्षक कार्यालयाने तेवढ्याच उत्तरपत्रिका पाठविल्याची

खात्री **custodian slip no- 100** व फॉर्म नं. ७ वरून करण्यात यावी व तसे मंडळास त्वरित लेखी स्वरूपात कळविण्यात यावे. ज्या नियामक /परीक्षकांना उत्तरपत्रिका तपासणीचे काम देण्यात आलेले नाही. अशा शिक्षकांना आवश्यकतेनूसार उत्तरपत्रिका तपासणीचे/मुल्यांकनाचे काम देण्यात येईल. तथापि अशा परीक्षक/नियामकांनी नकार न देता सदरचे काम करणे बंधनकारक आहे.

११. वैद्यकीय कारणास्तव मुल्यांकनाच्या कामातून परीक्षक / नियामकांच्या कामातून सूट मिळणार नाही, याची नोंद घ्यावी. ह्रदयरोग, कर्करोग आजारामुळे नकार देणा-या परीक्षक / नियामकांना शासकिय रूग्णालय / जिल्हा शल्य चिकित्सक रूग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिका-यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.त्यानुसार मंडळाकडून योग्य तो विचार केला जाईल.

१२. रात्र शाळेतील शिक्षकांची नावे दिवस व रात्र शाळेत दोन्ही ठिकाणी असल्यास दिवसाच्या शाळेतील परीक्षक/नियामक अंतिम नियुक्ती यादीवर स्वाक्षरी करावी, तसेच रात्र शाळेतील परीक्षक/ नियामक अंतिम नियुक्ती यादीवर स्वाक्षरी न करता दिवसाच्या शाळेतील शाळा क्रमांक व नियुक्ती क्रमांक व विषय हा लाल शाईने नमूद करावा. तसेचरात्र शाळेच्या क्रमांकापुढे दिवस शाळेचा सांकेतांक व नियुक्ती क्रमांक दर्शविण्यात यावा.

१३. परीक्षक/नियामक म्हणून नियुक्ती दिलेल्या शिक्षकांची नियुक्ती रद्द केली जाणार नाही, तसेच या कारणासाठी मंडळ अधिकारी/ कर्मचारी यांच्याशी कृपया संपर्क साधू नये .

टीप :- या परिपत्रकासोबत पाठविण्यात आलेली परीक्षक/नियामकांच्या नावाची संगणकीय यादी संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह दि. २८/०२ /२०२२ रोजी मंडळ कार्यालयात हस्तपोहोच जमा करावी. काही कारणास्तव यादी निर्धारित तारखेला जमा करता आलेली नसल्यास कोणत्याही परिस्थितीत पोस्टाव्दारे पाठविण्यात येवू नये. आपल्या शाळेच्या प्रतिनिधीमार्फत दुस-या दिवशी मंडळात हस्तपोहोच सादर करावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३

टीप :. १. विषय सांकेतांक क्रमांक व माध्यम बरोबर असल्याबाबत खात्री करावी.

२. अंतिम नियुक्ती झालेल्या नियामकांना विषयनिहाय नियामक सभेसाठी हजर राहण्याबाबत मंडळाकडून पत्र, दूरध्वनी किंवा एसएमएस करण्यात येईल त्यांनीच मंडळात उपस्थित रहावे.नियामक सभेस अनधिकृतपणे हजर राहिल्यास प्रवासभत्ता / दैनिक भत्ता दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.